**<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. ०१ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

**<u>अधिक सरतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री. व्ही.जी.टोपले यांचेमार्फत शपथेवर सरू</u>**

१२. साक्षीदारास नि.क्र. ४/४ कडील दाखल असलेले म्युनसिपल घर क्र. २४२०ब बाबतची घरपट्टी पावतीची मुळ प्रत दाखविण्यात आली. सदर घरपट्टी ही माझया घरीची असून ती नगरपरिषदेने मला दिलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर कर संचालक मालवण नगरपरिषद यांची सही आहे. ( प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांनी सदर दस्ताला निशाणी देण्यास आक्षेप नोंदविला. त्यांच्या कथन असे आहे की, सदर पावतीच्या मजकूराच्या सत्यतेबाबत साक्षीदाराला सांगता येणार नाही. याउलट वादीचे विधिज्ञ यांचे असे कथन आहे की, सदर दस्त हा सार्वजनिक दस्त असल्याने त्यास निशाणी देण्यात यावी. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला. सदर दस्त हा मुळ दस्त आहे. सदर दस्त हा वादीच्या नावाने देण्यात आलेला आहे. सदर दस्त हा मालवण नगरपरिषद यांचेकडून देण्यात आलेला आहे. सदर दस्त हा शासकीय कर्तव्य बजावताना देण्यात आलेला आहे. सबब, त्यास निशाणी देण्यास कोणतीही हरकत नाही. सबब, प्रतिवादींच्या विधिज्ञांनी घेतलेला आक्षेप फेटाळण्यात येत आहे. ) त्यास **<u>नि.क्र. ८५</u>** देण्यात येते.

१३. नि.क्र. ४/५ कडील दि. ०१/०८/२०११ रोजी नारायण एकनाथ आंबेरकर यांनी मला करुन दिलेल्या खरेदीखताची मुळ प्रत दाखविण्यात आली. सदर खरेदीखत मुळ मालक नारायण यांनी मला करुन दिलेले आहे. त्यावर नारायण एकनाथ आंबेरकर यांचा अंगठयाचा ठसा, सही आणि फोटो आहे. तसेच त्यावर माझी सही, अंगठा व फोटो आहे. तसेच त्यावर दोन साक्षीदारांच्या सहया आहेत. सदर दस्त हा मालवण दुय्यम निबंधक यांच्या कार्यालयात नोंदविण्यात आलेला असून कार्यालयाचा शिक्का आहे. सदर खरेदीदस्ताचा क्रमांक १०८७/२०११ असा आहे. त्यातील मजकूर खरा व

बरोबर आहे. नारायण आंबेरकर यांनी माझया समक्ष सही केल्याने मी त्यांची सही ओळखतो. त्यास **<u>नि.क्र. ८६</u>** देण्यात येते.

१४. साक्षीदारास नि.क्र. ४/६ कडील दाखल अ सलेला स.नं. २२९ हि.क्र. ८९ चा दि. ११/१०/२०१८ रोजीचा सहीसुद नकाशा दाखविण्यात आला. सदर नकाशा आहे नियमित कामय हद्द मोजणीचा नकाशाची ब प्रत आहे. त्यावर उपविभागीय अधिकारी भूमि अभिलेख यांचा शिक्का असून खरी प्रत म्हणून मुख्यालय सहाय्यक यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.८७</u>** देण्यात येते.

१५. साक्षीदारास नि.क्र. ४/८ वर दाखल असलेले दि. ०२/०६/२०२१ रोजीचे तहसिलदार मालवण यांचेकडे दिलेली तक्रारीची स्थळ प्रत दाखविण्यात आली. सदर स्थळप्रतीवर महसूल सहाय्यक तहसिलदार कार्यालय मालवण यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.८८</u>** देण्यात येते.

१६. साक्षीदारास नि.क्र. ४/९ वर दाखल असलेले दि. ०२/०६/२०२१ रोजीचे मालवण नगरपरिषद यांचेकडे दिलेली तक्रारीची स्थळ प्रत दाखविण्यात आली. सदर स्थळप्रतीवर मालवण नगरपरिच्छेद मालवण यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.८९</u>** देण्यात येते.

१७. साक्षीदारास नि.क्र. ४/१० वर दाखल असलेले ॲड गिरीश गिरकर यांनी दैनिक तरूणभारत या वत्मान पत्रात दिलेली दि. ०९/०१/२१२१ रोजी दिलेली जाहिर नोटीस दाखविण्यात आली. सदर नोटीस ही प्रतिवादींना मान्य असल्याने त्यास नि.क्र. ९० देण्यात यते.

१८. साक्षीदारास नि.क्र. ४/११ वर दाखल असलेले ॲड एस.एस.गवाणकर यांच्या मार्फत देण्यात आलेली दि. ०३/०२/२०२१ रोजीचे नोटीस दाखविण्यात आली.

सदर नोटीस ही नि.क्र. ९० च्या अनुषंगाने देण्यात आलेली होती. त्यावर ॲड. एस.एस.गवाणकर यांचा सही व शिक्का आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ९१** देण्यात येते. तसेच सदर नोटीस ॲड जी.जे.गिरकर यांना पोष्टल ॲक्नॉलेज आहे. त्यास **नि.क्र. ९२** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री.एस.व्ही.धामापुरकर यांचे तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्वीकृत

एम.के.फकीह
दि. ०१-११-२०२५ न्यायदंडाधिकारी वर्ग - १ मालवण.